**रोजगार हमी योजनेअंतर्गत धडक सिंचन विहीर कार्यक्रमांतर्गत यवतमाळ जिल्ह्यात देण्यात आलेल्या प्रती तालुका ३०० विहीरींच्या अतिरीक्त लक्षांकाच्या अंमलबजावणीस मुदतवाढ देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
नियोजन विभाग (रोहयो)
शासन निर्णय क्र.धडक -२०१६/प्र.क्र.५/रोहयो-५
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक - २१ मार्च, २०१७.

वाचा:-

१) शासन निर्णय क्रमांक- शासन निर्णय क्र.धडक -२०१६/प्र.क्र.५/रोहयो-५, दिनांक १४ डिसेंबर, २०१६.
२) जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचे क्रमांक रोहयो/अका-४/कावि/६३/२०१७, दिनांक २७.१.२०१७.

**प्रस्तावना:-**

यवतमाळ जिल्हयात होत असलेल्या शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या लक्षात घेता शेतकऱ्यांना कायमस्वरुपी सिंचनाची सोय उपलब्ध होण्यासाठी यवतमाळ जिल्ह्यातील सिंचन विहीर कार्यक्रम अंतर्गत घोषित केलेल्या परंतु न्यायालयीन प्रकरणास्तव होवू न शकलेल्या ४८०० विहिरी परत सुरु करणे बाबतची मागणी मा. पालकमंत्री व लोकप्रतिनिधी यांचेकडून करण्यात आली होती. त्यानुसार धडक सिंचन विहीर कार्यक्रमांतर्गत यवतमाळ जिल्ह्यासाठी देण्यात आलेल्या अतिरिक्त लक्षांकानुसार प्रति तालुका ३०० सिंचन विहिरी याप्रमाणे एकूण ४८०० विहिरी घेण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक १४ डिसेंबर, २०१६ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयान्वये यवतमाळ जिल्ह्यासाठी मा. पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आलेल्या समितीस दिनांक ३१ जानेवारी, २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. त्यासंदर्भात जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी संदर्भाधीन क्र. २ येथे नमूद पत्रान्वये यवतमाळ जिल्ह्याकरिता मा. पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली धडक सिंचन विहिर कार्यक्रमासाठी गठित करण्यात आलेल्या लाभार्थी निवड समितीस मुदतवाढ देण्याची विनंती केली आहे. सदर बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक :-**

धडक सिंचन विहीर योजने अंतर्गत यवतमाळ जिल्ह्यासाठी मा. पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त लाभार्थी निवड दिनांक ३१ जानेवारी, २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. आता, जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी सदर समितीस मुदतवाढ मिळणेची मागणी केली आहे. तद्नुसार धडक

सिंचन विहीर कार्यक्रमांतर्गत यवतमाळ जिल्ह्यासाठी मा. पालकमंत्र्याच्या अध्यक्षतेखाली नियुक्त लाभार्थी निवड समितीस दिनांक ३०.७.२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.**

**(डॉ. प्रमोद शिंदे)**
**उपसचिव (रोहयो)**

१. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव,
२. मा.मंत्री (रोहयो), यांचे खाजगी सचिव,
३. सर्व मा.मंत्री, / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. मुख्य सचिव यांचे सहसचिव
५. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती
६. जिल्हाधिकारी, यवतमाळ
७. उप जिल्हाधिकारी, (रोहयो) यवतमाळ
८. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ
९. कार्यकारी अभियंता, लघु सिंचन विभाग जिल्हा परिषद यवतमाळ
१०. मा. सचिव (रोहयो) यांचे स्वीय सहायक मंत्रालय, मुंबई
११. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
१२. महालेखापाल, (लेखापरिक्षा), महाराष्ट्र १ व २, मुंबई व नागपूर,
१३. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ व २, मुंबई व नागपूर,
१४. सहायक संचालक (लेखा) रोहयो-७ नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१६. निवडनस्ती रोहयो-५